● रविवार, दि. २७ ऑक्टोबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ९४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# बबनराव लोणीकरांचे ठरले ; २९ रोजी नामनिर्देशन पत्र सादर करणार

## सुधीर मुनगंटीवार यांच्यासह २० हजार समर्थक राहणार उपस्थित

**जालना । प्रतिनिधी -** परतूर विधानसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवारी माजी मंत्री बबनराव लोणीकर हे येत्या मंगळवार (दि २९) रोजी नामनिर्देशन पत्र सादर करणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी वने व सांस्कृतिक मंत्री राहिलेले भाजपाचे वरिष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्याचसोबत मतदार संघातील २० हजार लोणीकर समर्थक यावेळी उपस्थित राहणार आहेत.

माजी मंत्री बबनराव लोणीकर हे परतूर मतदार संघाचे विद्यमान आमदार आहेत. त्याचबरोबर भारतीय जनता पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत सातव्यांदा त्यांना उमेदवारी दिली आहे. पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या मोजक्या नेत्यांमध्ये त्यांची गणना होते. पाणी युतीच्या काळात पुरवठा व स्वच्छता मंत्री असतांना त्यांनी केलेले कार्याची आजही दखल घेतल्या जाते.

**बैठकांचा धडाका**

परतुर मतदार संघातील गावोगाव बबनराव लोणीकरांचा बैठकांचा धडाका सुरु असून मंठ्यातील माऊली मंगल कार्यालय तळणी फाटा येथे केंधळी जिल्हा परिषद सर्कल व खोराड सांवगी जिल्हा परिषद सर्कलसह मंठा शहरातील कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीला मार्गदर्शन करतांना लोणीकर यांनी केलेल्या विकास कामांचा पाढा वाचला. यात प्रामुख्याने दिव्यांगांना सुरक्षा साहित्य वाटप पंधराशे रुपये मासिक मानधन सुरु केले, अनाथ बालकांच्या खात्यात १३ लाख २७ हजार रुपये जमा झाले. सावित्रीबाई फुले स्वतंत्र्य स्वंय योजनेतून अनाथ पालकांना दिलासा, मंठा-परतूरातील वीजेचा प्रश्नावर लोणीकरांनी सांगितले की, पेवा येथे ३३/११ केव्हीचे नवीन सब स्टेशन मंजुर झाले आहे. त्यामुळे शेतीला २४ तास वीज मिळणार आहे. गावागावातील खेड्यापाड्यातील तांडे वाड्यावस्तीवर २४ तास वीज उपलब्ध राहणार आहे. आरडीएसएस योजनेतून विजेचे पोल व नविन डिप्या उभारणीचे काम प्रगतीपथावर असल्याचे लोणीकर म्हणाले. अर्जुन पाडेवार यांनी आयोजित केलेल्या बैठकीतही लोणीकरांनी हजेरी लावली. यावेळी इजरान कुरेशी, सतीश सोनवणे, मलिक कुरेशी, जरील शेख, शेख फरान, नदीम काजी आदींची उपस्थिती होती. शिवाजी बल्लमखाने यांच्या निवासस्थानीही भाजपा कार्यकर्त्यांची बैठक पार पडली यावेळी प्रकाश दिक्षीत, बाळू दशमले, दीपक पुरी, संदीप बाहेकर, बालाजी सांगोळे, ओम मोर, उत्तम माने, विश्वनाथ बल्लमखाने, शिवाजी बल्लमखाने, रफिक शेख, सलीम काजी यांची उपस्थिती होती तर पारधी वाडा येथील कुरेशी मोहल्ला येथील बैठकीत आर एफ कुरेशी, इजराम एक्का, इसा कुरेशी, अबू कुरेशी, मसूद, जलील लाल, शेख जावेदरिंग, काजी सत्तार, शेख महबूब कुरेशी, सर्या चव्हाण, ईसार खातीब, शेषराव चव्हाण, माणिक कुरेशी, विजय सोनटक्के माणिक इंगळे यांची उपस्थिती होती.

**आदीवासी समाजातील तरुणांचा भाजपात प्रवेश**

आमदार लोणीकर यांच्या नेतृत्त्वावर विश्वास ठेवत शेकडो आदीवासी समाजातील तरुणांनी भाजपात प्रवेश केला आहे. परतूर येथील ॲड. सुरेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोंड्या पवार, कुणाल जाधव, अशोक चव्हाण, प्रकाश चव्हाण, पंजाब काळे, गजाननन इंगळे, राजू चव्हाण अजय पवार, सचिन काहे, तात्या काळे, राम काळे, संतोष काळे, तुळशीराम काळे, कटाळू चव्हाण, उमेश पवार, दशरथ हिवराळे, शेषराव चव्हाण, राहुल पवार, निलेश हिवाळे, शिवाजी




काळे, गणेश पवार, संदीप पवार, आसाराम पवार, हनुमान पवार, नीरज चव्हाण, अजय काळे, मंगल पवार यांच्यासह शेकडो आदीवासी समाजातील तरुणांनी भाजपात प्रवेश केला आहे.

**भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी**

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बबनराव लोणीकर हे परतूर मतदार संघात ठाणू मांडून असून विविध बैठका-दौऱ्यानंतर मतदार संघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या घरी जावून ते भेटी गाठी घेत आहेत. परतूर येथे सतीश सोनवणे, दीपक पुरी, शिवाजी बल्लमखाने, मलिक कुरेशी, गणेश ठाकूर, भगवान मोरे, प्रकाश अंभोरे, दिनेश होलानी यांच्या निवासस्थानी भेट घेऊन उपस्थित नागरिकांशी बबनराव लोणीकर यांनी संवाद साधला. विविध ठिकाणी झालेल्या झंझावती दौऱ्यात बबनराव लोणीकर यांच्यासमवेत भाजपाचे तालुकाध्यक्ष शत्रगुण कणसे, दया काटे महाराज, डॉ संजय पुरी, नगरसेवक कृष्णा आरगडे, संदीप बाहेकर, प्रवीण सातोणकर, प्रकाश चव्हाण, रवी सोळंके, पद्माकर कवडे यांची उपस्थिती होती.



**प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत असलेल्या हॉकर्स सेलच्या मराठवाडा विभाग प्रदेश कार्यकारी प्रमुखपदी दिनकर घेवंदे यांना मुंबई येथील काँग्रेस कार्यालयात नियुक्ती पत्र देण्यात आले. यावेळी प्रदेश काँग्रेस सरचिटणीस प्रशासन व संघटनचे प्रमोद मोरे, श्रीमती प्रज्ञा वाघमारे उपस्थितीत होत्या.**

# विकासाचे मुद्दे हाच अजेंडा घेऊन निवडणुक लढवणार - आ. कैलास गोरंट्याल

## शहराला दररोज पाणी पुरवठा आणि विद्यापीठासाठी प्रयत्न करणार

**जालना । प्रतिनिधी -** विकासाचे मुद्दे हाच अजेंडा घेऊन निवडणुक लढणार असून शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याबरोबरच जालन्यात विद्यापीठ मंजूर करुन घेण्याचा आपला राहणार असल्याची ग्वाही जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंटयाल यांनी शनिवार (दि २६) रोजी पत्रकारांशी बोलतांना दिली.

जालना विधानसभा मतदार संघातून आज शनिवारी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आल्यानंतर आपल्या प्रितीसुधा नगर येथील निवासस्थानी ते पत्रकारांशी बोलत होते. काँग्रेस पक्षाच्या वतीने आपल्याला सहाव्यांदा जालना विधानसभेची उमेदवारी दिल्याबद्दल गोरंटयाल यांनी सर्वप्रथम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी, प्रियंका गांधी, पक्षाचे ज्येष्ठ नेते वेणुगोपाल, पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेनीथला, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार आदींचे आभार व्यक्त करून आपण केलेल्या कामाची ही पावती असल्याचे सांगितले. मागील काळात आपण जालना शहरातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावला असून



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून ते सुरू होण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला आणि प्रयत्नांना मोठे यश मिळाले. विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जातांना विकासाचे मुद्दे हाच आपला अजेंडा राहणार आहे. शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा व्हावा यासाठी आपण प्रयत्न करणार असून जायकवाडी प्रकल्पाद्वारे सध्या शहराला १५ एमएलडी इतका पाणी पुरवठा होत असून अंबड शहराजवळ असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रात सुरू असलेले काम पूर्ण झाल्यानंतर आणखी ३५ एमएलडी असे एकूण ५० एमएलडी पाणी शहराला मिळणार असून घानेवाडी ते शहरातील जलशुद्धीकरण केंद्र असे नवीन जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर संत गाडगेबाबा जलाशयातून देखील पाणी पुरवठा शहराला होणार आहे. याशिवाय हातवन येथूनही शहराला पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल. हे प्रयत्न यशस्वी झाले तर मुंबई, पुणे, नागपूर नंतर दररोज पाणी पुरवठा करणारे जालना शहर हे राज्यातील चौथे शहर होईल असा विश्वास महाविकास **पान २ वर**

# आठ महिन्याच्या बालकावर दुर्बीणद्वारे मुतखड्याची यशस्वी शस्त्रक्रिया

## पालकांच्या विश्वासामुळे शक्य - डॉ. लड्डा

**जालना । प्रतिनिधी -** अवघ्या ८ महिन्याच्या बालकावर दुर्बीणद्वारे मुतखड्याची शस्त्रक्रिया जालना येथील आशीर्वाद सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये यशस्वी झाली आणि १३ मि. मी. चा मुतखडा बाहेर काढण्यात आला. अत्यंत



कमी वयात जराशीही भूल देणे, दुर्बीणने शस्त्रक्रिया करणे अत्यंत जोखमीचे होते. मात्र, पालकांनी विश्वास दाखविल्याने हे सर्व शक्य झाल्याचे डॉ. प्रवीण लड्डा यांनी सांगितले.

याविषयी अधिक माहिती अशी की, बुलढाणा जिल्ह्यातील एका खेडेगावातील आठ महिन्याचे बालक खूप दिवसापासून रडायचे. त्यांनी अनेक दवाखाने केले. तपासांती सोनोग्राफी केली असता, त्यात १३ मिलिमीटरचा मुतखडा आढळून आला. त्यांना छत्रपती संभाजीनगर येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला. दरम्यान, जालना येथेही आशीर्वाद सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये लहान बालकांवर मुतखड्याच्या यशस्वी शस्त्रक्रिया होत असल्याची माहिती पालकांना कुणाकडूनतरी मिळाली आणि ते या हॉस्पिटलमध्ये आले. मूत्रविकार तज्ञ व सर्जन डॉ. प्रवीण लड्डा यांना भेटले आणि इथेच शस्त्रक्रिया करण्याचा आग्रह धरला. लहान **पान २ वर**


**युवा आदर्श**

**नवीन पिढी ...**

**नव्या पिढीची हटके
भिन्न लाईफ स्टाईल
खळखळ विनोदाही
गालात देता स्माईल
निवड आवड भिन्न
मोजूनमापून खाईलं
फिगर मेंटेन्ड ठेवावी
कॅलरी करी बॉईल
करीयर मागे धावावे
लग्न केव्हाही होईल
चेकिंग करावी नीट
जोडीदाराची फाईल
लीव इन रिलेशनची
साथ तपासून घेईलं
दोन्ही गाड्या तपासू
पहावे पेट्रोल ऑईल
बॅलन्स शीट जोखून
बाळ जन्मास येईलं
भविष्य रे सेक्युअर
महत्व आधी देईलं
आई बाबा खोलीबंद
पाहुणे जोवर राहीलं
पचकन् बोलते काही
इभ्रत सगळी जाईलं**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांची परतूर येथे पाहणी



परतूर । प्रतिनिधी - विधानसभा सार्वत्रिक निवडणुक कार्यक्रम घोषित झाल्यानंतर निवडणुक आयोगाचे सूक्ष्य आणि बारकाईने नियोजन सुरु असून जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघावर जिल्हाधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी श्रीकृष्ण पांचाळ हे नजर ठेवून आहेत. परतूर विधानसभा मतदारसंघातील कार्याचा त्यांनी पाहणी करुन आढावा घेतला. येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान व २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी आहे. त्या अनुषंगाने निवडणुक अधिकारी डॉ. पांचाळ यांनी आंबा येथील स्ट्रॉंग रुमची पाहणी केली. यावेळी परतूर विधानसभा मतदार संघाचे निवडणुक निर्णय अधिकारी पद्माकर गायकवाड, सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी डॉ. प्रतिभा गोरे, मंठा तहसीलदार सोनाली जोंधळे, नायब तहसीलदार निवडणुक विभाग कुलदीप कुलकर्णी, गटविकास अधिकारी राजेश तांगडे आदींसह निवडणुक कार्यक्रमात सहभागी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

घनसावंगी येथे निवडणुक निर्णय अधिकारी पांचाळ यांनी घेतला आढावा

# मतदान नियोजन, स्ट्रॉंग रुमची केली पाहणी

**घनसावंगी । प्रतिनिधी -** विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ १०० - घनसावंगी विधानसभा मतदार संघाचा दौरा केला. यावेळी त्यांनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, राजेगाव रोड, घनसावंगी येथे भेट देवून तेथील विधानसभा निवडणूकीचे नियोजन, गृह मतदान, मतदान अधिकारी आणि कर्मचारी यांचे प्रशिक्षण, पोस्टल बॅलेट मतदान नियोजन, स्ट्रॉंग रूम आणि मतमोजणी कक्षाची पाहणी केली. तसेच, तहसील कार्यालयातील मतदान प्रक्रियेचा आणि नामनिर्देशन बाबतच्या तयारीचा संपूर्ण आढावा घेतला.



त्यावेळी शशिकांत हदगल, उपजिल्हा निवडणूक अधिकारी, जालना, उपविभागीय अधिकारी अंबड तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, श्रीमती योगिता खटावकर, तहसीलदार घनसावंगी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, विजय चव्हाण, तहसीलदार अंबड तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, संतोष इथापे, नायब तहसीलदार घनसावंगी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, समीर जाधव, गटविकास अधिकारी, घनसावंगी, श्रीमती मोनाली सोनावणे, नायब तहसीलदार घनसावंगी, .विवेक उढाण, नायब तहसीलदार, अंबड, धीरज भामरे, मुख्याधिकारी, नगर पंचायत, घनसावंगी, विजय पाटील, अधिव्याख्याता, शासकीय तंत्रनिकेतन, अंबड, रवि जोशी, गटशिक्षणाधिकारी, घनसावंगी, डॉ.सखाराम पवळ, तालूका कृषी अधिकारी, घनसावंगी, श्रीमती मनिषा पैठणे, दुय्यम निबंधक, घनसावंगी, श्री.धर्माधिकारी, नायब तहसीलदार अंबड हे उपस्थित होते.

संपादकीय पान

अस्मानी असो वा सुलतानी नैसर्गिक संकट असो वा अन्याय अत्याचार नेहमीच तळपते पत्रकारांच्या निर्भीड लेखणीची धार

# लोकशाहीच्या प्रक्रियेत चौथा स्तंभ स्वातंत्र्यानंतर आजही उपेक्षित

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी** - परतीच्या पावसाने संपूर्ण माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्याला सलग पंधरा ते वीस दिवस झोडपून काढले. त्यामुळे संपूर्ण माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील लाखों हेक्टर भातशेतीचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे ऐन दसरा दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांच्या अर्थात बळीराजाच्या डोळ्यात दुःखाचे अश्रू आले. आपल्या डोळ्या देखत हातातोंडाशी आलेला शेतातील धान्यरुपी घास परतीच्या पावसाने हिरावून घेतला. त्यामुळे संपूर्ण माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील सर्व शेतकरी वर्ग भयग्रस्त झाला होता. सलग पंधरा ते वीस दिवस परतीच्या पावसाने संपूर्ण रायगड जिल्ह्यात अहोरात्र हाहाकार माजवला होता त्यामुळे बळीराजाचे अतोनात नुकसान झाले. जिल्ह्यातील बळीराजाचे हे दुःख, त्यांच्या व्यथा, निसर्गाचा प्रकोप आणि अस्मानी संकटामुळे तमाम शेतकरी वर्गाचे झालेले अतोनात नुकसान या बाबत माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील सर्व पत्रकारांनी आपापल्या परीने प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या प्रभावश लेखणी अस्त्राचा वापर करून शासन प्रशासना समोर मांडल्या म्हणून प्रशासकीय यंत्रणेला खडबडून जाग आली. आणि माय बाप सरकार, शासन प्रशासन यंत्रणा तात्काळ शेतकर्यांच्या तथा बळीराजाच्या दारी अर्थात शिवारात नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी दाखल झाली. झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून त्या नुसार शेतकर्यांना नुकसान भरपाई मिळावी असे अपेक्षित आहे. म्हणून संकटग्रस्त बळीराजाच्या मुखातून पत्रकारांच्या कामगिरी विषयी नकळत शब्द बाहेर पडतात.... ते म्हणजे पत्रकारितेची किमया लय भारी...! प्रशासन धावले बळीराजाच्या दारी...!!

देशाच्या, राज्याच्या, जिल्ह्याच्या अथवा गावाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात कुठेही कधीही कोणत्याही घटकांवर अन्याय अत्याचार झाला किंवा देशाच्या कानाकोपऱ्यात कुठेही कधीही अवर्षण, प्रवर्षण,दुष्काळ, रोगराई निसर्गाचा प्रकोप वा कोणत्याही प्रकारचे अस्मानी सुलतानी संकटं आली तर सर्व प्रथम आपल्या जीवाची पर्वा न करता आपल्या कुटुंबाची पर्वा न करता तात्काळ शासनाच्या खांद्याला खांदा लावून शासकीय उपक्रमात, ध्येय धोरणात, निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन आपली संविधानिक जबाबदारी निस्वार्थी वृत्तीने बजावतो तो पत्रकार, आपल्या संविधानिक लोकशाहीच्या इतर स्तंभाच्या तुलनेत नेहमीच उपेक्षित राहिला आहे.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. लेखणी हे त्याचे संविधानिक अस्त्र ब्राह्मास्त्रापेक्षाही शेकडो पटीने प्रभावशाली क्षेपणास्त्र आहे. या क्षेपणास्त्राचा वापर तो किती निस्वार्थी वृत्तीने लोककल्याणासाठी करतो यावर त्याचा प्रभाव आणि परिणाम निर्भर आहे. म्हणून प्रत्येक पत्रकाराने आपल्या या संविधानिक अधिकाराचा वापर रंजल्या गांजल्या, गोर गरीब, पिडीत, अन्यायग्रस्त जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे लोककल्याणकारी दृष्टीकोनातून केला पाहिजे. त्याच बरोबर दुसरीकडे शासन प्रशासनाची देखील ही नैतिकजबाबदारी आहे. ती म्हणजे प्रत्येक पत्रकाराला त्याच्या या संविधानिक अधिकाराचा तथा लेखणी रुपी क्षेपणास्त्राचा वापर अत्यंत निर्भयपणे नेक व निस्वार्थी वृत्तीने लोककल्याणकारी दृष्टीकोनातून करण्यासाठी इतर तीन स्तंभा प्रमाणेच सर्व प्रकारच्या सुखसुविधा आणि संविधानिक अधिकार प्रदान केले पाहिजेत. ज्यामुळे राज्यातील सर्व पत्रकार आत्मनिर्भर होऊन आपला पत्रकारिता धर्म अत्यंत निकोप आणि निस्वार्थी वृत्तीने बजावतील यात शंका नाही. शासनाने सद्य स्थितीत पत्रकारांची अवस्था ''बिन पगारी आणि फुल्ल अधिकारी'' अशी करून ठेवली आहे. त्यामुळे पत्रकारिता या क्षेत्रात बहुतांश उच्च शिक्षित तरुणाई आपले करिअर करण्यासाठी धजावत नाही. उलट या क्षेत्राकडे पाठ फिरवतात. त्यांचा तो निर्णय काही अंशी योग्यच आहे. कारण पत्रकार हा सुद्धा एक माणूसच आहे. त्यालाही कुटुंब आहे, त्यालाही इतरांप्रमाणे भौतिक गरजा आहेत.




लोकशाहीच्या विधीमंडळ, न्यायपालिका आणि कार्य पालिका तथा प्रशासन या तीन स्तंभा प्रमाणे अथवा घटकांप्रमाणेच चौथ्या स्तंभाला अर्थात प्रसार माध्यमे म्हणजेच पत्रकार यांना सर्व प्रकारच्या सरकारी पगार, मोबदला,सुखसुविधा आणि अधिकार प्रदान करणे ही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. कारण लोकशाहीच्या वरील तीन स्तंभा प्रमाणेच प्रसारमाध्यमे तथा पत्रकार देखील आपली संविधानिक पत्रकारितेची जबाबदारी विनामोबदला, विना सुखसुविथा, विनातक्रार स्वातंत्र्या पासून आजतागायत अत्यंत निस्वार्थी वृत्तीने इमानेइतबारे बजावतात आले आहेत. मात्र शासनाने लोकशाहीच्या या अत्यंत महत्त्वपूर्ण चौथ्या स्तंभाला सर्वार्थाने आजवर उपेक्षितच ठेवले आहे. शासनाचे हे वर्तन संविधानिक नाही. कारण भारतीय संविधानानुसार ज्याअर्थी प्रसार माध्यमे आणि पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे हे मान्य केले आहे. त्याअर्थी शासनाने इथून पुढे प्रसार माध्यमे आणि पत्रकार यांना लोकशाहीच्या इतर तीन स्तंभा प्रमाणेच सर्व सरकारी तथा शासकीय सोईसुविधा, पगार, भत्ते, निवास व्यवस्था प्रदान करण्याचा सहानुभूती पूर्वक विचार करून लवकरात लवकर शासन निर्णय पारीत करावा हीच तमाम पत्रकारांची रास्त अपेक्षा आहे.

## विनोदाचे अचूक टायमिंग साधणारा

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज जन्मदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म सत्तर वर्षापुर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला. विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला जन्मदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

### विकासाचे मुद्दे ...

आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांनी व्यक्त केला. कॉलेजमध्ये जाणारा विद्यार्थी हा प्रवेश घेतल्यापासून परिक्षेपर्यंत अभ्यास करतो. आणि काही विद्यार्थी हे नकला मारून पास होतात. मात्र, मुलाखतीसाठी गेल्यानंतर ज्याने परिक्षेपर्यंत अभ्यास तोच पास होतो. नक्कल करणारा विद्यार्थी पास होत नाही असा टोला आ. कैलास गोरंट्याल यांनी नावं न घेता आपले प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुनराव खोतकर यांना लगावला.

### आठ महिन्याच्या ...

मुलांमध्ये भुल देणे व दुर्बीणद्वारे शस्त्रक्रिया जोखमीचे असते, असे डॉ. लड्डा यांनी यांनी सांगितले असता, आम्ही ती जोखीम पत्करण्यास तयार असल्याचे आणि आम्हाला विश्वास असल्याचे पालकांनी सांगितले. पूर्वअनुभव व पालकांच्या विश्वासामुळे ही शस्त्रक्रिया दुर्बीणद्वारे करण्यात आली आणि १३ मिलिमीटरचा मुतखडा यशस्वीरीत्या बाहेर काढण्यात आला. बाळही सुखरूप आहे. या शस्त्रक्रियेसाठी डॉ. प्रवीण लड्डा यांना भुलतज्ञ डॉ. प्रतीक्षा होलाणी-लड्डा, अजय घुले, हॉस्पिटलचे इतर डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मराठी अभिजात भाषा चला ज्ञानभाषा करू या!' लेख स्पर्धा

अमृततुल्य, संतांची, ज्ञानवंतांची, कीर्तिवंतांची, शूरांची, वीरांची, विजिगीषू अशी आपली मराठी मायभाषा! या आपल्या अमृततुल्य मराठी भाषेस अभिजात भाषेचा बहुमान मिळणे हे सर्वच मराठीप्रेमींचे स्वप्न होते. यासाठी सर्वांनीच गेली बारा वर्षे सातत्याने प्रयत्न केले, केंद्राकडे पाठपुरावा केला. अखेर मराठी भाषेचा सन्मान होऊन ती जगाच्या पाठीवर जाण्यासाठी सज्ज झाली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही गौरवाची बाब आहे परंतु खऱ्या अर्थाने ती आज अभिजात राहिली आहे का? वाघिणीचे दूध म्हणून तत्कालीन समाजधुरिणांनी जिची शिफारस केली त्या इंग्रजी भाषेवर आताचे पालकही स्वार झाले आहेत. जागतिक संवादाची भाषा बनलेल्या इंग्रजीचे गारुड पालकांना मोहिनी घालताना दिसत आहे. यामुळे मराठी शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यात १४७८३ मराठी शाळा बंद पडल्या आहेत. हे असेच सुरू राहिले तर...

अभिजात भाषेचा दर्जा मिळणं ही अभिमानाची गोष्ट आहे, पण हा मिळालेला दर्जा टिकविण्यासाठी प्रयत्न करणं त्याहून महत्त्वाचं ठरणार आहे. दोन हजार वर्षांहून अधिक काळाची समृद्ध साहित्यिक परंपरा असलेली मराठी भाषा आणि तिचे साहित्य आपल्या पुढच्या पिढींपर्यंत टिकवून ठेवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी झालेली आहे.

वृत्रपत्रलेखकांच्या चळवळीतील प्रमुख संस्था सन २०२४ हे वर्ष अमृतमहोत्सवी सांगता वर्ष साजरा करीत असताना 'मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई', 'मराठी विचारधारा प्रतिष्ठान, गोरेगाव' तसेच गेली बारा वर्षे अमेरिकेत मराठी संस्कृती, साहित्य जपण्याचा आणि संवर्धनाचा प्रयत्न करणाऱ्या 'मराठी कल्चर अँड फेस्टिवल्स संस्थे'च्या अध्यक्षा ऐश्वर्या कोकाटे (लॉस एन्जेलिस) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी अभिजात भाषा चला ज्ञानभाषा करू या!' विषयावर राज्यस्तरीय खुली लेख स्पर्धा आयोजित केली आहे.

देशपरदेशातील मराठी भाषाप्रेमी, साहित्यिक, राजकारणी, कलावंत, खेळाडू, स्पर्धा परीक्षार्थी, शिक्षक-प्राध्यापक-विद्यार्थी यांनी यात भाग घ्यावा. या स्पर्धेची शब्दमर्यादा दोन हजार असून पहिल्या तीन विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र आणि रोख रक्कम तसेच इतरांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल, असे संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी घोषित केले आहे. माहिती पत्रकासह अधिक माहितीसाठी स्पर्धा प्रमुख सुनील कुवरे ९१६७३६४८७० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे.

## ४९ वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा-प्रदर्शन २०२४

## दिवाळी अंक प्रकाशकांना आवाहन

१९४९ पासून अनेक उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून सातत्याने कार्यरत असलेल्या आणि वृत्तपत्र लेखन चळवळीचे यंदा अमृतमहोत्सवी सांगता वर्ष साजरे करीत असलेल्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही ४९ वी राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने १९७६ पासून मराठी भाषेची वैभवशाली दिवाळी अंक प्रदर्शन परंपरा जपली जाते आहे, या वर्षी संपूर्ण महाराष्ट्रात आणि परदेशात अमेरिका लॉस एंजिइल्स येथे पोहोचणार आहे. या उपक्रमात गोरेगाव येथील मराठी विचारधारा प्रतिष्ठान, अमेरिकेतील लॉस एंजिइल्स येथील मराठी संस्कृती.




ले, - चउऋ र्ङ्गेपवरींळेप - मराठी कल्चरल अँड फेस्टिव्हल ही संस्था सहभागी होत आहे. या मान्यताप्राप्त आणि लोकप्रिय स्पर्धेसाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातूनही अंक येत असतात. सर्वोत्कृष्ट अंकासाठी मनोरंजनकार का र मित्र स्मृती पुरस्कार तर आवाजकार मधुकर पाटकर पुरस्कृत सर्वोत्कृष्ट विनोदी अंक, साने गुरुजी स्मृती सर्वोत्कृष्ट मुलांचा अंक, सर्वोत्कृष्ट धार्मिक अंक, मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत वसंतराव होशिंग स्मृती महिला संपादित सर्वोत्कृष्ट अंक, कृष्णराव भानुसे स्मृती उत्कृष्ट दिवाळी अंक, पास्कोल लोबो पुरस्कृत गणेश केळकर स्मृती उत्कृष्ट अंक, मनोहरपंत चिवटे स्मृती सर्वोत्कृष्ट आरोग्य विषयक अंक यासह स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या अंकांचा उत्कृष्ट आणि उल्लेखनीय अंक म्हणून पारितोषिक देऊन मराठी भाषा दिन २७ फेब्रुवारी रोजी मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात येतो. स्पर्धा व प्रदर्शनासाठी आलेले हे अंक मुंबई-ठाणे शहरात प्रदर्शन आयोजित करून मांडले जातात. त्यानंतर हे अंक ग्रामीण भागातील शाळा-वाचनालयांना मोफत दिले जातात. दिवाळी अंकांच्या संपादक-प्रकाशकांनी २ प्रती - रवींद्र मालुसरे, अध्यक्ष-मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, घरकुल सोसायटी, रूम न. ६१२, ६ वा मजला, सेंच्युरी बाजार लेन, भुस्सा इंड. समोर, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवींद्र मालुसरे ९३२३११७७०४ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन उमेदवारीबाबत निर्णय घ्यावा; जेथलियांचा पक्षाला दोन दिवसांचा अल्टिमेटम

## शहरात पदयात्रा काढून केले शक्तीप्रदर्शन

**परतूर । प्रतिनिधी -** काँग्रेस पक्षाने विधानसभेची उमेदवारी नाकारून आपल्यावर अन्याय केला असल्याचे सुरेशकुमार जेथलिया यांनी म्हटले असून कार्यकर्त्यांच्या भावना लक्षात घेऊन उमेदवारीबाबत निर्णय घ्यावा असा दमच सुरेशकुमार जेथलिया यांनी पक्षाला भरला असून निर्णयासाठी काँग्रेस पक्षाला दोन दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. अन्यथा कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर अपक्ष लढविण्याची तयारी असल्याचेही सुरेशकुमार जेथलिया यांनी म्हटले आहे. शहरात पत्रयात्रा काढून मोठे शक्तीप्रदर्शन जेथलीया यांनी केले पदयात्रेनंतर ते कार्यकर्त्यांना संबोधित करतांना बोलत होते.

परतुर विधानसभेची जागा काँग्रेसची असतांना काँग्रेस उमेदवार सुरेशकुमार जेथलिया यांच्यावर अन्याय करीत शिवसेनेला सोडल्याने नाराज कार्यकर्त्यांनी आज भव्य पदयात्रेचे आयोजन करून बैठक घेतली या बैठकीत मार्गदर्शन करताना मा.आ.सुरेश जेथलिया म्हणाले की, दहा वर्षात सत्तेत नसताना अहोरात्र जनतेची कामे करत आलो. तरी आपली हक्काची जागा असताना या ठिकाणी शिवसेनेचा उमेदवार देण्यात आला. आपल्याला विधानसभेची उमेदवारी नाकारून काँग्रेस पक्षांनी माझ्याबरोबरच कार्यकर्त्यांवरही अन्याय केला आहे.त्यामुळे दोन दिवसात काही निर्णय झाला नाही तर आपण ४ तारखेपर्यंत मतदारांच्या कौल पाहून अपक्ष सामोरे जायचे की नाही हे निर्णय घेऊ.ही निवडणूक



महत्त्वाची व प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे तुम्हीच निर्णय घ्या. असे सांगून कार्यकर्त्यांनी कुकर चिन्ह घ्या असे म्हणताच आ. जेथलिया म्हणाले की मी कुकरवर जरी निवडून आलो तरी पंजा सोडणार नाही कारण हा पंजा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारा काँग्रेस पक्षाचा आहे. मी फक्त तुमच्यासाठी लढणार असून तुम्हीच निर्णय घ्या असेही माजी आमदार सुरेश कुमार जेथलीया यांनी सांगितले. यावेळी परतूर आष्टी मंठा नेर शेवली या ठिकाणाहून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केले यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले.

परतुर येथे पदयात्रेनंतर बैठकीत बोलताना युवा नेते नितीन जेथलिया म्हणाली की प्रत्येक वेळी आम्हाला संघर्ष करावा लागला. आम्ही परतुरला राहतो जालना औरंगाबाद पुणे मुंबईला राहत नाही या ठिकाणी राहून अहोरात्र जनतेची कामे करतो तरीही पक्षाकडून आम्हाला त्रास होतो व आज उमेदवारी ही नाकारली आम्ही धार्मिक व चारित्र्यसंपन्न आहोत. या निवडणुकीत टक्केवारी खाणाऱ्या लोकप्रतिनिधीला पाडायचं आहे. पक्षाने आपल्यावर अन्याय केला आहे आपल्याच पक्षातील काही काँग्रेस संपवायला निघाले आहेत मात्र काँग्रेस संपणार नाही.यावेळी बैठकीस मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# टेंभुर्णी मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

## लहान मुलांसह बकरीच्या पिलांना वाढतोय धोका



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याने लहान मुलांसह बकरीच्या पिलांना या कुत्र्यांपासून धोका निर्माण झाला आहे दरम्यान बकरीची अनेक मुलांना या कुत्र्यांनी लचके तोडले आहेत. विशेष म्हणजे प्रत्येक गल्लीमध्ये ३0 ते ४0 कुत्र्यांचा समूह एकत्रितपणे फिरत असतो विशेष करून छत्रपती शिवाजी महाराज चौक जुने बस स्थानक आंबेगाव रोड या भागांमध्ये या कुत्र्यांचे जत्थे नियमित पहावयास मिळतात.

येथील मास विक्रेत्यांकडून कोंबडीचे पखे व इतर मासाचे तुकडे रस्त्यालगत फेकल्या जात असल्याने नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतो दरम्यान यामुळे कुत्र्यांच्या तोंडी रक्त लागत असल्याने ते जिवंत पिलांसह लहान मुलांवर हे हल्ले करतात याबाबत नागरिकांनी वारंवार मागणी करूनही या कुत्र्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने दिवसेंदिवस गावात कुत्र्यांची संख्या वाढतच आहे दरम्यान कोणीतरी बाहेरगावावरून कुत्र्या आणून सोडले असल्याचे येथील सामाजिक कार्यकर्ते शारेक सिद्दिकी यांनी सांगितले.

येथील देऊळगाव राजा रस्त्या लगत चौफुलीवर मोठ्या प्रमाणावर कोंबड्यांची पिसे व इतर घाण टाकली जात असल्याने या चौफुलीवर कायम कुत्र्यांचे टोळके वावरत असते या ठिकाणाहून शेतात जाणाऱ्यांसह शाळेत जाणाऱ्या मुलांची ये- जा असते यामुळे या भागात टाकल्या जाणाऱ्या घाणीवर ग्राम संसद कार्यालयाने निर्बंध घालावेत अशी मागणी होत आहे.

### जालना जिल्हा समाजवादी पक्षाची तातडीची बैठक

# जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघात उमेदवार उतरवणार - नबी सिपोराबर

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या लोकसभा निवडणुकीच्यावेळेस समाजवादी पक्ष हा महाविकास आघाडीचा घटक पक्ष होता मात्र, महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पक्षाला समाधानकारक जागा मिळत नसल्याने वरिष्ठ पातळीवरुन राज्यभरात उमेदवारी देण्याबाबत चाचपणी सुरु आहे त्याचाच भाग म्हणून जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघात उमेदवार समाजवादी पक्षाचे उमेदवार उतरवणार असल्याचे पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर यांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले आहे. त्या अनुषंगाने रविवार (दि २७) रोजी पक्षाची तातडीचे बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक रेल्वे स्टेशन रोडवरील कृष्णा प्लाझा येथील समाजवादी पक्षाच्या जालना कार्यालयात सकाळी ११ वाजता होणार आहे. या बैठकीस समाजवादी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर यांनी केले आहे.

# पत्रकार सखारामपंत कुलकर्णी यांचे विरुद्ध ठोस पुरावा नसतांना चौकशी न करता दाखल केलेला गुन्हा मागे घेण्याची मागणी

## माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे निवेदन



**नांदेड । प्रतिनिधी -** माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष पदी कार्यरत असलेल्या, ज्येष्ठ नागरिक आणि ज्येष्ठ पत्रकार असलेल्या श्री सखारामपंत कुलकर्णी यांच्यावर वजीराबाद पोलीस स्टेशन येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळ, उमरदरी या संस्थेच्या सचिव आणि याच संस्थेअंतर्गत सुरू असलेल्या शाळेत शिपाई पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती निलाबाई बबनराव जाधव (शिंदे) यांनी दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी श्री कुलकर्णी यांनी दि. १९ मार्च रोजी ५0 हजार रुपये खंडणी मागितल्याचा खोटा आणि बिनबुडाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सामाजिक भावनेतून कार्य करणाऱ्या एखाद्या निष्कलंक पत्रकारावर असे खोटे, बिनबुडाचे आणि कसलाही ठोस पुरावा नसलेले गुन्हे दाखल होत असतील तर ते संविधानाच्या चौथ्या स्तंभास अर्थात पत्रकारितेस धोकादायक होईल. भविष्यात याची पुनरावृत्ती होऊ शकते आणि समाजविघातक वृत्तीने गुन्हे दाखल होऊ शकतात आणि पत्रकारांचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. ज्याचा प्रखरपणे विरोध होणे आवश्यक असल्याने आज दिनांक २३ ऑक्टोबर २०२४ रोजी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री महेश सारणीकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अधीक्षक नांदेड यांना गुन्हा दाखल करणाऱ्या वजिराबाद पोलिस स्थानकातील पोलिस यंत्रणेची कसून चौकशी करून त्रयस्थपणे सत्यता पडताळून निर्णय घ्यावा आणि दाखल गुन्हा परत घ्यावा यासाठी निवेदन देण्यात आले. पोलिस अधीक्षकांनी निष्पक्षपणे चौकशी करून दोषींवर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले असून संबंधित विषय मला ज्ञात असून यापूर्वी देखील निवेदन आणि पत्रव्यवहार झाला असल्याची माहिती दिली.

वजीराबाद पोलीस स्टेशन येथे दाखल करण्यात आलेला गुन्हा हाच मुळात धादांत खोटा असल्याचे दिसून येत असून गुन्हा दाखल करण्याआधी कसल्याच प्रकारची प्राथमिक चौकशी केलेली नसतांना आणि कुठलाही ठोस पुरावा नसतांना पोलीस यंत्रणेकडून गुन्हा नेमका कशा प्रकारे दाखल करण्यात आला ? हा पहिला प्रश्न, गुन्हा दाखल करणाऱ्या पोलीस यंत्रणेचा व्यक्तिगत स्वार्थ दडलेला असू शकतो का ? हा दुसरा प्रश्न, १९ मार्चच्या मागितलेल्या खंडणीचा १३ ऑक्टोबर म्हणजे जवळपास ७ महिन्यानंतर तक्रार का देण्यात आली ? हा तिसरा प्रश्न आणि संस्थेचा सभासद संस्थेच्या सचिवाला खंडणी मागेल का ? हा चौथा प्रश्न आहे. श्री कुलकर्णी हे संबंधित जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी या संस्थेचे आजीव सभासद असून संबंधित संस्थेचे अध्यक्ष श्री शिवाजी जाधव यांचेविरुद्ध श्री कुलकर्णी यांची मा. धर्मादाय आयुक्त नांदेड आणि मा. उच्च न्यायालय खंडपीठ, संभाजीनगर येथे संविधानिक लढाई सुरू असून ती अंतिम टप्प्यात आहे. याच पार्श्वभूमीवर अध्यक्षांनी व्यक्तिगत शत्रुत्वाचे भूमिकेतून, श्री कुलकर्णी यांचे आत्मविश्वासाचे खच्चीकरण, सामाजिक बदनामी, तसेच कौटुंबिक, आर्थिक, मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक हानी घडवून आणून कामात अडथळा निर्माण करण्यासाठी श्रीमती निलाबाई बबनराव जाधव (शिंदे) यांच्यामार्फत खोट्या तक्रारी देण्याचे षडयंत्र रचल्याचे सरळ आणि स्पष्ट होते, ही गोष्ट देखील पोलीस अधीक्षक साहेबांना निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.

संबंधित निवेदन दाखल करण्यासाठी माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समितीचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री महेश सारणीकर त्याबरोबरच जालन्याचे मराठवाडा विभागीय सहसचिव श्री राजू शिंदे आणि जालना जिल्हा सचिव श्री जगन्नाथ घोडे, छ. संभाजीनगरचे मराठवाडा विभागीय समन्वयक श्री रमेश सुरशे, पैठण तालुका उपाध्यक्ष श्री बाळासाहेब गवळी, नांदेडचे मराठवाडा विभागीय संघटक श्री ओमप्रकाश पत्रे, नांदेड जिल्हाध्यक्ष श्री महादेव उप्पे, नांदेड जिल्हा उपाध्यक्ष श्री माधव काईतवाड, देगलूर तालुका उपाध्यक्ष श्री नंदकुमार वलकले आणि श्री श्रीनिवास बिरादार, अर्धापूर शहराध्यक्ष श्री राजेश्वर देशमुख आणि अर्धापूर तालुका सदस्य श्री आरिफ पिंजारी असे समितीचे सर्व स्तरातील पदाधिकारी उपस्थित होते. याबरोबरच योग्य ती कार्यवाही होण्यासाठी समितीचे शिष्टमंडळ पोलिस महासंचालक, मुंबई यांना भेटून संबंधितांवर योग्य त्या कार्यवाहीची मागणी करणार असल्याची माहिती देण्यात आली.

# ललितकला विभागाच्या वतीने जेईएस मध्ये लोककला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** दिवाळीमध्ये शालेय विद्यार्थी व युवकांमध्ये लोककलेची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने येथील जेईएस महाविद्यालयाच्या ललितकला विभाग आणि लोकपरिवर्तन बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने 0४ ते १४ नोव्हेंबर दरम्यान लोककला प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या लोककला विभागात या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये गण, गौळण, शाहीरी, गोंधळ, जागरण, वासुदेव, भारुड या लोककला प्रकारांचे आणि ढोलकी, संबळ, दिमडी, शाहीरी डफ, टाळ, तुणतुणे या लोकवाद्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या वर्षी दिवाळीचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांसाठी लोककला शिबिराचे आयोजन केले असून या शिबिरात 'महाराष्ट्र शाहीर', 'पांडू' चित्रपटाचे गायक आणि महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध शाहीर रामानंद उगले आणि सुप्रसिद्ध गीत आणि संगीतकार प्रा. कल्याण उगले प्रशिक्षण देणार आहेत.

आपल्या अनेक पिढ्यांचा लोककलेचा वारसा बाल वयापासूनच सांभाळत असणारे जालना जिल्हाचे युवा कलाकार कल्याण उगले आणि शाहीर रामानंद उगले यांना वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून या गोंधळ परंपरेचा परंपरेचे शिक्षण वडील शाहीर आप्पासाहेब उगले यांच्याकडून मिळाले. विविध यात्रा,उत्सव, महोत्सवात आज पर्यंत पाच हजारहून अनेक लोककलेचे प्रयोग त्यांनी आजतागायत केले आहे.

'झी मराठी' वरील 'संगीत सम्राट' या रियालिटी शो मधून त्यांनी महाराष्ट्रभर नावलौकिक मिळविला आहे .त्यानंतर अनेक टीव्ही शो च्या माध्यमातून आपली लोककला प्रेक्षकापर्यंत पोहोचवण्याचे काम केले आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक केदार शिंदे यांच्या 'महाराष्ट्र शाहीर' या चित्रपटात तब्बल ११ गाणी शाहीर रामानंद उगले यांनी गायली आहेत. तसेच विजू माने दिग्दर्शित व अवधूत गुप्ते यांनी संगीतबद्ध केलेला 'पांडू' या चित्रपटात सुद्धा त्यांनी पार्श्वगायन केले आहे.

गाडी घुंगराची आली, टाच मारुनी घोड्याला, अंबाबाई लाड लाड ये ग



आणि शाहीर कल्याण उगले यांनी रचलेले पोवाडे महाराष्ट्र भर गाजत आहे. महाराष्ट्राची लोककला , संस्कृती टिकून राहावी यासाठी उगले बंधू यांनी शाहीर रामानंद ऑफिशियल चॅनेल तयार करून महाराष्ट्राची लोकगाणी ही पहिली लोकसंगीत वेब सिरीज प्रेक्षकांच्या भेटीस आणली महाराष्ट्र आणि देश विदेशातील मराठी प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. हीच परंपरा टिकून राहावी यासाठी जालना शहरात या लोककला शिबिर आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात सहभागी होण्यासाठी प्रा.कल्याण उगले किंवा मराठी विभाग प्रमुख डॉ . यशवंत सोनुने यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी केले आहे.

# टेंभुर्णीच्या नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचा तेजस सोनाळकरची क्रीडा स्पर्धेत तेजस्वी कामगिरी




**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील श्रीमती.जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा हरहुन्नरी अष्टपैलू खेळाडू विद्यार्थी तेजस सोनाळकर याने नुकत्याच झालेल्या विभागीय स्तरावरील- शालेय सायकलिंग स्पर्धेत चमकदार कामगिरी केली असून तेजस सोनाळकर याची राज्यस्तरावर निवड झाली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजी नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४/१०/ २०२४. रोजी- छत्रपती संभाजी नगर शेंद्रा येथे झालेल्या विभागीय स्तरावरील-क्रीडा स्पर्धा पार पडल्या , या स्पर्धेत सायकलिंग क्रीडा प्रकारात श्रीमती.जे.बी.के व .नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तेजस सोनाळकर याने चमकदार कामगिरी केली आहे ,त्यामुळे त्याची राज्यस्तरावरील स्पर्धे साठी निवड झाली. त्याच्या या निवडीचे व त्यास मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षक राजे शेवाळे, क्रीडा शिक्षक कैलास भुतेकर, यांचे नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव.सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माझी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दीपक काबरा, संचालक मधुकरराव निकम, , संचालक विश्वनाथराव सांगुळे, संचालक तथा उपप्राचार्य प्रा.दत्ताजिराव देशमुख टेंभुर्णीकर, संचालक प्रदिप काबरा, संचालक,प्रदिप मुळे, सर्व संचालक मंडळ तथा प्राचार्य.नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक धनंजय पुराणे, एस.बी.बोरकर, क्रीडा अधिकारी, तसेच सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र संघटनेचे पदाधिकारी श्री. चंद्रशेखर घुगे सर, क्रिडा विभाग प्रमुख कैलास भूतेकर, क्रिडा मार्गदर्शक राजेश शेवाळे,व प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव,रमेश इंगळे, विष्णू जाधव,राजेंद्र जगताप, रवींद्र मोरे, दिनकर उखर्डे, दत्ता उखर्डे, भीवसान ससाने, संजय कुलकर्णी, गणेश सावसक्के, आवटी मॅडम, पाटील मॅडम, भिलावेकर मॅडम, कळंबे मॅडम, शेख मॅडम, लंबे मॅडम, राजू डोमळे, नागोराव देशमुख, दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख,सर्व कॉलेजचे विद्यार्थी शाळेतील विद्यार्थी यांनी हार्दिक अभिनंदन करून तेजस सोनाळकर यास राज्यस्तरीय होणा-या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेत भारज (बू) जिल्हा परिषद शाळेचे यश

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद,जालना द्वारा आयोजित हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धा दिनांक रोजी पी.एम. श्री.जिल्हा परिषद प्रशाला, जाफ्राबाद येथे वर्ग ६ ते ८ प्राथमिक तर वर्ग ९ ते १0 माध्यमिक गटांसाठी आयोजित करण्यात आलेली होती. सदरील स्पर्धेत जि.प.के.प्रा.शाळा भारज (बू) शाळेने घवघवीत यश संपदीत करत तालुक्यातून प्राथमिक गटात प्रथम क्रमांक पटकावला.यशस्वी विद्यार्थिनी कु. सोनल नाईक व कु.आरती पायघन या विद्यार्थिनींनी भावी पिढीसाठी विभक्त कुटुंब पद्धती योग्य की अयोग्य या विषयावर त्यांचे विचार अत्यंत प्रभावीपणे मांडून उपस्थितांना मंत्रमुग्ध करत तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकवला सदरील दोन्ही विद्यार्थिनींना उषा चव्हाण, सुनिल वायाळ,दत्ता गवळी यांचे मार्गदर्शन लाभले.सदरील कार्यक्रमाच्या प्रसंगी जाफ्राबाद तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी



श्री.सतीश शिंदे साहेब, विस्तार अधिकारी श्री.रामराव फोलाने विषयतज्ञ नारायण पिंपळे विशेष शिक्षक आदि उपस्थित होते. या शाळेच्या यशामध्ये सर्व शिक्षकांनी विशेष सहकार्य केले.विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.शरद तेलंग्रे मुख्याध्यापक श्री. राजकुमार खंडेलवाल केंद्रप्रमुख अशोक चिंचोले, विस्तार अधिकारी जिनेंद्र काळे,प्रवीण इंगळे , अन्नासाहेब बुरुंगे,अभय मुळे गजानन उखळकर गजानन सोळंकी,अनंता सोळंके, दिलीप अंभोरे, परमेश्वर वाघ,कृष्णा जंजाळ,अनिल काळे, श्रीमती अनिता सोनटक्के श्रीमती मीना इंगळे अमर चोरमले अरुण घोडके सचिन सुरडकर राजू भुते सर्व शिक्षक गावकरी यांनी अभिनंदन केले आहे. शाळेचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# गणेश चव्हाण यांच्यावर शिवसेना शहर संघटकपदाची धुरा

## माजीमंत्री अर्जुनराव खोतकर यांची प्रमुख उपस्थिती



**जालना । प्रतिनिधी -** अनेक वर्षापासून शिवसेना या पक्षाचे काम करणारे तसेच माजी मंत्री अर्जुन खोतकर यांचे विश्वासु चंदनझिरा येथील गणेश चव्हाण पाटील यांची नुकतीच शिवसेना शहर संघटक म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. माजी मंत्री तथा शिवसेना उपनेते अर्जुनभाऊ खोतकर यांच्या उपस्थितीत ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे साहेब व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आर्शिवादाने महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने व शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर, युवासेना सचिव अभिमन्यु खोतकर यांच्या आदेशाने आपली शिवसेना शहर संघटक जालना पदी नियुक्ती करण्यात येत आहे. तरी आपण शिवसेना, किसानसेना व युवासेना संघटन वाढीसाठी तसेच मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांचे विचार तळागाळा पर्यंत पोहचवुन पक्ष हिताचे काम आपल्याकडुन पुढील काळात होईल ही अपेक्षा वर्तवण्यात आली आहे. या निवडीबद्दल गणेश पाटील चव्हाण यांचे युवासेना सचिव अभिमन्यू दादा खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहर प्रमुख विष्णुभाउ पाचफुले, शिवसेना फ ेरोज लाला तांबोळी,योगेश रत्नपारखे, जफर खान,शुभम टेकाळे,प्रमोद पवार, संतोष रासवे,रामभाऊ गाडेकर, रितेश पंचारीया,राहुल भोईटे,गणेश ईंचे, जगदीश रत्नपारखे,गणपत धोत्रे, गणेश तुपे, यांच्यासह शिवसेना, युवासेना पदाधिकारी कार्यकर्ते यांच्याकडून अभिनंदन करण्यात आले आहे.

# 'मीना बाजार' भरवण्यास मनाई

## अन्यथा मनपा कारवाई करणार

जालना । प्रतिनिधी - शहरातील सुभाष रोड व सिंधी बाजार परिसरात भरविण्यात येणारा मीना बाजार यंदा भरविण्यास जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने सक्त मनाई करण्यात आली आहे. मीना बाजार भरविल्यास पोलीस प्रशासनासह म नपाकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

मनपाच्यावतीने देण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, शहरातील फेरीवाले, हातगाडीवाले, किरकोळ विक्रेते यांनी सुभाष रोड व सिंधी बाजार परिसरातील भरविण्यात येणाऱ्या मीना बाजार बंद करण्याबाबत मा. उच्च न्यायालय मुंबईच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका क्रमांक ४७२६/२००३ दाखल झालेली आहे. याबाबत मा. न्यायालयाने दिनांक ०९.१०.२०२४ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार शहरात मीना बाजार भरण्यास सक्त मनाई करण्यात आलेली आहे.

त्यामुळे फेरीवाले, हातगाडीवाले, किरकोळ विक्रेते यांनी सुभाष रोड व सिंधी बाजार परिसरात विक्री व्यवसाय करु नये, विक्री व्यवसाय करतांना आढळून आल्यास पोलीस प्रशासन व जालना शहर महानगर पालिकातर्फे कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही प्रसिद्धी पत्रकात नमुद आहे. दोन दिवसांपुर्वीच व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने बाजार न भरण्यासंदर्भात मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेऊनच मनपा प्रशासनाच्यावतीने मीना बाजार भरविण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मनपाने मनाई केली असली तरी यास फेरीवाले, हातगाडीवाले, किरकोळ विक्रेते किती प्रतिसाद देतात हा मोठा प्रश्न आहे. त्यानंतर मनपाकडुन नेमकी काय कारवाई करण्यात येईल हे देखील पुढे स्पष्ट होईलच.

# परतूर पोलिस उपविभागात केली १०२ समाज कंटकाविरुध्द प्रतिबंधक कारवाई



**परतूर । प्रतिनिधी -** अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उपविभाग परतुर अंतर्गत मागील काळातील घडलेल्या गुन्हयामधील समाज कंटकावर, हिस्ट्रीसिटर यांचेवर निवडणूक अंनुषंगाने एक विशेष मोहीम राबवून १०२ जनावर प्रतिबंधक कारवाई केली. या कारवाईने समाज कंटकांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

परतूर पोलीस स्टेशन हद्दीतील मागील काळातील घडलेल्या गुन्हयामधील सम ाजकंटक, हिस्ट्रीसिटर यांचेवर कलम १२६ बीएनएसएस प्रमाणे ३७ समाजा कंटकावर व तसेच कलम १२९ बिएनएसएस प्रमाणे आठ जणावर प्रतिबंधक कारवाई केली आहे. तसेच उपविभाग परतूर मधील एकूण १०२ समाजाकंटक, हिस्ट्रीसिटर यांचेवर प्रतिबंधक कारवाई परतूर पोलीस स्टेशन येथे अप्पर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी यांनी स्वतः उपस्थित राहून केली आहे. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी दादाहरी चौरे, पोलिस निरिक्षक एम.टी. सुरवसे, मंठ्याचे पोनि निकाळजे, मौजपुरीचे सपोनि घुगे, आष्टीचे सपोनि सचिन इंगेवाड, सेवलीचे सपोनि खटकळ उपस्थित होते.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.